# भारत-चीन सीमाप्रश्नाचे बदलते परिप्रेक्ष

**डॉ वसंत आबासाहेब खरात**

*राज्यशास्त्र विभाग,*

*संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य*

*व ब.ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर.*

**प्रस्तावना :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण होणारी समस्या सोडविणे किंवा तशीच चिघळत ठेवणे हे दोन पर्याय असतात. समस्या सोडविली नाही तर कालांतराने सत्ता समतोल बदलताच त्या प्रश्नाला चालना मिळत असते. समस्या निराकरण करण्यासाठी युध्द किंवा शांततापूर्ण मार्गाने वाटाघाटी हे दोन पर्याय असतात. संबंधित राष्ट्रांची क्षमता, आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि समस्येचे महत्व या तीन घटकांना संघर्षाच्या राजकारणात महत्व असते. आजच्या अण्वस्त्र युगात युद्धाद्वारे समस्या सोडविण्याची साधी कल्पनादेखील केली जाऊ शकत नाही. या परिस्थितीत शेवटचा मार्ग उरतो तो म्हणजे शांततापूर्ण मार्गाने वाटाघाटी. समस्या निराकरण होण्यासाठी निरंतर, संयमाने व समंजस प्रयत्न करावे लागतात. याच मार्गाने भारत-चीन सीमाप्रश्नाचा दोन्ही देशांना उलगडा करावा लागणार आहे. भारत-चीन यांच्यात सीमाप्रश्नावरून सशस्त्र संघर्षाची ठिणगी पडू न देणे व त्याचबरोबर या दोन्ही देशांनी तशी वेळ न येऊ देणे हेच उभय राष्ट्रांच्या आणि आशियाई राष्ट्रांच्या हिताचे आहे. प्रत्येकवेळी राजनीती येशस्वी झाली पाहिजे. तलवारी परजल्या असल्या तरी त्या म्यानच असल्या पाहिजेत. वाकयुद्ध हे प्रत्येक्ष शस्त्रसंघर्षात रुपांतरीत होता कामा नये. भारत-चीन यांच्यात सीमाप्रश्नावरून दीर्घकाळ अशांततेचा धांडोळा आपण या लेखात घेणार आहोत.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

चीन व भारत ही आशियातील दोन सगळ्यात मोठी शेजारी राष्ट्रे. उभय राष्ट्रांत इ.स. पूर्व २२१ पासून १०० व्या शतकापर्यंत सांस्कृतिक, धार्मिक व व्यापारी संबंध होते. याशिवाय या दोन देशांतील विविध सत्ता केंद्रांचे परस्परांशी प्रासंगिक स्वरूपाचे राजनयिक संबंध आढळतात. ते संबंध उत्तर भारताशी भूमार्गाने आणि दक्षिण भारताशी जलमार्गाने राहत असत. मध्य आशिया आणि अफगाणिस्तान इस्लामी राजवटीच्या छायेखाली आल्यामुळे आणि आग्नेय आशिया व भारत यांच्या दरम्यान असलेल्या समुद्रावर अरब व्यापाराची सत्ता प्रस्थापित झाल्यामुळे या दोन्ही देशांचा परस्परांशी संबंध तुटला. यानंतरच्या कालखंडात फक्त तिबेट व पूर्वांचल या दोन मार्गांनी फारच मर्यादित स्वरूपाचा अप्रत्येक्ष संपर्क राहिला असे आढळून येते. पुढे ब्रिटीश कालखंडात तिबेट प्रश्नावरून भारतातील ब्रिटीश सरकार व चीन यांचा राजकीय संबंध आला. परंतु १९४७ पर्यंत त्या दोहोत संपर्क फारसा नव्हता. परंतु भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या अंतिम टप्प्यात भारतीय व चीनी नेत्यांदरम्यान सौहार्दाचे संबंध प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली होती. १९३१ साली जपानने चीनच्या मांचुरियावर आक्रमण केले. या आक्रमणामुळे भारतीय नेत्यांची चीनला सहानुभूती होती. १९३७ मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले तेव्हा राष्ट्रीय काँग्रेसने चीनच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून एक वैद्यकीय पथक पाठविले होते. १९३९ मध्ये पंडित नेहरूंनी चीनला भेट दिली. १९४२ मध्ये चीनचे सर्वोच्च नेते व राज्य प्रमुख चँग-के-शेक यांनी भारताला भेट दिली तेव्हा त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचे समर्थन केले होते. जानेवारी १९४७ मध्ये भारताने के.पी.एस. मेनेन यांना भारताचे चीनमधील प्रतिनिधी मंडळ प्रमुख नियुक्ती करून उभय राष्ट्रांत संबंध प्रस्थापित केले. १ ऑक्टोबर १९४९ रोजी माओ-त्से-तुंगच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये साम्यवादी सरकार प्रस्थापित झाले. ३० डिसेंबर १९४९ रोजी भारताने चीनला सार्वभौम राष्ट्र म्हणून राजनैतिक मान्यता दिली.

**भारत-चीन मैत्रीसाठी भारताची बांधिलकी :**

भारताने स्वातंत्र्यपूर्व काळातच आपल्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये व दिशा निश्चित केली होती. स्वतंत्र भारताचे त्याच्या शेजारी राष्ट्रांशी व अन्य इतरही राष्ट्रांशी सलोख्याचे व सौहार्दपूर्ण संबंध असतील असे पंडित नेहरूंनी वारंवार आकाशवाणीवरून व इतर प्रसंगी जाहीर केले होते. या नीतीला अनुसरून भारताने १९५०-१९५८ या काळात चीनसोबत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित

करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. चीनने तिबेटवर लष्करी कारवाई करून नियंत्रण प्रस्थापित केले तेव्हा भारताने सुरुवातीस चीनची निंदा केली परंतु पुढे १९५४ मध्ये चीनसोबतच्या संबंधात कटुता येऊ नये म्हणून तिबेटवरील चीनचा अधिकार मान्य केला. कोरियन युद्वात उतरल्याबद्दल चीनला आक्रमक ठरविणारा ठराव पाश्चिमात्य राष्ट्रांनी फेब्रुवारी १९५१ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत मांडला त्यावेळी भारताने या ठरावाविरुध्ह मत देऊन चीनला पाठींबा दिला. याच काळात पंडित नेहरू, राधाकृष्णन, चाऊ-एन-लाय, सन-येत-सेन अशा नेत्यांनी परस्परांच्या राष्ट्रांना भेटी दिल्या. २९ एप्रिल १९५४ रोजी दोन्ही राष्ट्रांनी ऐतिहासिक 'पंचशील' तत्वांना मान्यता दिली. पंचशील करारानुसार १) परस्परांच्या प्रादेशिक एकात्मतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर कारणे २) अनाक्रमण ३) अहस्तक्षेप ४) मैतीपूर्ण संबंध आणि ५) शांततामय सहजीवन ही सूत्रे मान्य केली. यावेळी भारताने चीनला तैवान प्रश्नावर आणि चीनने भारताला गोवा प्रश्नावर पाठींबा घोषित केला.

१९८८ मध्ये दिवंगत पंतप्रधान राजीव गांधींच्या चीन भेटीनंतर उभय देशांदरम्यान असलेला सीमावाद वाटाघाटीच्या माध्यमातून सोडविण्यासाठी संयुक्त कार्यकारी गटाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून दरवर्षी या संयुक्त कार्यकारी गटाची बैठक होते. चर्चेची औपचारिकता पूर्ण केली जाते. परंतु सीमावाद कायम स्वरूपी सोडविण्याच्या दृष्टीने कोणतेही ठोस पाऊल उचलले जात नाही. यामागचे मुख्य कारण म्हणजे चीनची कोणतीही तडजोड न करण्याची हट्टी भूमिका.

**२००५ चा द्विपक्षीय करार :**

भारत-चीन दरम्यान असणाऱ्या सर्व सीमावादाची सोडवणूक करण्यासाठी स.न. २००५ मध्ये द्विपक्षीय करार करण्यात आला आहे. त्यानुसार ' सीमा प्रश्न सोडविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि राजकीय सूत्रे' स्विकारण्यात आली होती. या करारानुसार सीमा प्रश्न सोडविण्यासाठी सहा मुख्य राजकीय तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. एक, दोन्ही देश एकमेकांबद्दल आदरभाव राखत सीमेसंबंधीच्या आपापल्या दाव्यांमध्ये तडजोड करतील, जेणेकरून सीमावादाचे समाधान अंतिम आणि सर्व क्षेत्रांचा समावेश करणारे असेल. दोन, दोन्ही देश परस्परांचे सामरिक हित तसेच एकमेकांच्या सुरक्षेचा विचार करतील. तीन, दोन्ही देश ऐतिहासिक पुरावे, राष्ट्रीय भावना, वस्तुनिष्ठ समस्या, परस्परांच्या चिंता व संवेदना आणि प्रत्यक्ष सीमेवरील परिस्थिती या बाबी विचारात घेतील. चार, दोन्ही देशांना मान्य होईल अशी नैसर्गिक भौगोलिकदृष्ट्या व्यवस्थित ठरवता येण्याजोगी व सहज निदर्शनास येईल अशी सीमा असावयास हवी. पाच, सीमा प्रश्नावर अंतिम समाधान शोधताना दोन्ही देश सीमा भागात स्थाईक असलेल्या आपापल्या लोकसंख्येच्या हितांचे रक्षण करतील. सहा, वर मान्य करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार दोन्ही देशांतील सीमेला अंतिम रूप देताना आधुनिक नकाशाशास्त्र, सर्व्हे पद्धती आणि संयुक्त सर्व्हे या सर्वांचा आधार घेण्यात येईल. परंतु नंतर त्या सूत्रांना नजरेआड करत चीनने भारताच्या तावांगसारख्या मोठी लोकसंख्या असणाऱ्या भागावर हक्क सांगावयास सुरुवात केली. त्यामुळे सीमाविवाद कायम राहिला.

**महत्त्वाकांक्षी चीनचे विस्तारवादी धोरण :**

तिबेट हा चीनचा तळहात आहे आणि नेपाल, भूतान, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश ही त्या तळहाताची बोटे आहेत. हे चीनी नेते माओ-त्से-तुंग यांचे विधान चीनच्या विस्तारवादी, वसाहतवादी मनोवृत्तीचे साक्ष देणारे आहे. कोणत्या तरी ऐतिहासिक संदर्भांच्या आधारे शेजाऱ्यांच्या ताब्यातील भूभागांवर आक्षेप घ्यायचा, त्यांना स्वतःच 'वादग्रस्त' घोषित करून टाकायचे आणि कालांतराने स्वतःच्या सार्वभौमत्वाचा हवाला देऊन त्या वादग्रस्त भूभागांवर डेरा टाकण्याची चीनची खोड जुनीच. म्हणून तर वीसपैकी पंधरा शेजाऱ्यांबरोबर चीनचे सीमाप्रश्न भळभळत आहेत. भारतावर तर अधिकच डूख. कारण भारत एकाच वेळी शेजारी, आर्थिक व राजनैतिक स्पर्धक आणि चीनच्या एकाधिकारशाहीला आव्हान देण्याची क्षमता बाळगणारा तितकाच अवाढव्य लोकशाहीवादी देश. त्यामुळे सरकारे कोणतीही असली तरी चीनबरोबरील संघर्ष अटळ.

**भारताबद्दल चिनचे पूर्वग्रह :**

मागील एक दशकापासून भारत-चीन सीमेवर चीनच्या कुरबुरींमध्ये आणि कुरापतींमध्ये वाढ झाली आहे. खासकरून गेल्या तीन चार वर्षांत त्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. कधी अरुणाचल प्रदेश हे त्याचे निमित्त असते किंवा मग आजवर शांत राहिलेल्या लडाखमध्ये केलेली चिनी घुसखोरी हे कारण ठरते. महासत्ता होण्यासाठी चीन प्रयत्नपूर्वक पावले टाकत आहे. आणि

याच खंडात असलेला भारत हा त्यांना मोठा अडसर वाटतो आहे.

भारताचा आशिया खंडातील वाढता प्रभाव आणि एकूणच जागतिक राजकारणातील वाढते महत्व त्याचबरोबर वेगाने होणाऱ्या आर्थिक विकासात अवरोध निर्माण करणे आणि आशिया खंडाचे नेतृत्व स्वतःकडे घेणे अशा दुहेरी उद्देशाने चीन आर्थिक, राजकीय, कूटनीती, मानसिक आणि सामरिक आघाड्यांवर भारताला कोंडीत पकडून दबाव टाकण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. भारताबद्दल चीनचा विरोधी दृष्टीकोन असण्याचे मुख्य कारण वर वर जरी भारत-चीन सीमावाद वाटत असले, तरी प्रत्यक्षात आशियाचे नेतृत्व चीनला स्वतःकडे पाहिजे आहे. भारत त्याच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे, असे चीनला वाटते. दक्षिण आशियातील भारताचा वाढता प्रभाव हा चीनच्या चिंतेचा मुख्य विषय आहे. याच चिंतेपोटी भारताला आव्हान देण्यासाठी व दक्षिण आशियातील छोट्या राष्ट्रांना भारताच्या प्रभावातून मुक्त करण्यासाठी नेपाल, भूतान, श्रीलंका मालदीव, बांगलादेश या देशांना चीन भरघोष आर्थिक तसेच लष्करी मदत करीत आलेला आहे. आशिया खंडातील वर्चस्वासाठी भारताच्या शेजारी राष्ट्रांना आपल्या गटात सामील करत चीन त्या प्रत्येक राष्ट्रात पायाभूत सुविधांच्या उभारणीत गुंतला आहे. भारताच्या सर्व शेजाऱ्यांशी मैत्री दृढ करण्यावर चीनचा भर आहे. शेजारी राष्ट्रांना आपलेसे करत चीन भारताला एकाकी पाडण्याचा प्रयत्न करत आहे. अलीकडे चीनची ही नीती कमालीची यशस्वी झाल्याचे दिसते. मालदीव आणि भूतानचा अपवाद वगळता बांगलादेश, श्रीलंका, नेपाळसोबत भारताचे पूर्वीसारखे सौहार्दपूर्ण संबंध राहिलेले नाहीत. नेपाळसारख्या टीचभर राष्ट्राने तर देशाचा नवीन नकाशा प्रकाशित करून व संसदेत तो बहुमताने पास करून भारताच्या ताब्यातील लीपुलेख, कालापानी आणि लिंपियाधुरा या भागांसह ३९५ चौकिमी प्रदेशावर आपला दावा ठोकून भारतासोबत सरळसरळ सीमावाद उकरून काढला आहे. नेपाळच्या या साहसामागे चीनचीच फूस आहे हे नाकारता येणार नाही. पाकिस्तान-चीन मैत्री विकसित झाली; याचे मुख्य कारण म्हणजे ' शत्रूचा शत्रू तो आपला मित्र ' हे चीनचे धोरण. भारताला सर्व बाजूंनी वेढा घालून भारताला दक्षिण आशियाच्या भू-राजकारणात गुंतवून ठेवण्याचे चीनचे धोरण असून, परिणामी स्वतःला आशियातील एकमेव महासत्ता म्हणून प्रस्थापित करण्याचा तिचा चंग आहे. चीनच्या दीर्घकालीन वाटचालीत प्रचंड आकार, लोकसंख्या आणि अर्थव्यवहारात भरारी घेण्याची क्षमता असणारा भारत हा प्रतिस्पर्धी आहेच. शिवाय शेजारीही आहे. साहजिकच तातडीचं प्रभावक्षेत्र दोघांसाठी समान आहे. यात चीनला कुणीही वाटेकरी नको असतो. 'आशियात चीन हीच निर्विवाद ताकत आहे' हे शेजाऱ्यानं आणि जगानं मान्य करावं ही चीनची धडपड आहे. एकदा तसं घडलं की चीन अधिक आक्रमकपणे जगाच्या व्यवहारात स्थान मिळवायचा प्रयत्न करेल. या वाटचालीत भारताला डिवचत राहणं हे चीनसाठी गरजेचं बनतं. डोकलाम असो की आताचा लडाखमधील पेच असो, हे याचंच निदर्शक आहे. शीतयुद्धोत्तर काळात भारत-अमेरिका संबंधात झालेली सुधारणा आणि उभय राष्ट्रांदरम्यान वाढते आर्थिक आणि लष्करी सहकार्य हे चीनच्या आशिया खंडातील धोरणापुढचे एक महत्वाचे आव्हान बनले आहे. भारताला एक विभागीय सत्ता बनविण्याचे प्रयत्न अमेरिकेकडून होत आहेत. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री कोंडोलिझा राईस यांनी २००५ मध्ये स्पष्ट केले की, भारत एकविसाव्या शतकातील एक मोठी सत्ता म्हणून उदयास यावा, अशी अमेरिकेची इच्छा असून त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यास अमेरिका तयार आहे. २००८ साली अमेरिका-भारत यांच्यात झालेल्या अणुइंधनाच्या ऐतिहासिक करारामुळे चीनच्या आशियातील वर्चस्वाला आव्हान निर्माण होणार यामुळे चीनची चिंता अधिकच वाढली आहे.

**भारत-चीन सीमावाद व १९६२ चे युद्ध :**

भारत आणि चीन या प्राचीन संस्कृतींमधील देवाणघेवाण सर्वश्रुत आहे. आधुनिक काळात ही मैत्री जोपासणे दोन्ही देशांचे नैसर्गिक कर्तव्य असून पाश्चिमात्य वर्चस्वाला छेद देण्याचे काम दोन्ही देश एकत्रितपणे करू शकतात अशी धारणा २० व्या शतकाच्या पूर्वार्धात निर्माण झाली. ७ सप्टेंबर १९४६ रोजी केलेल्या रेडीओ भाषणात पंडित नेहरू यांनी ही भूमिका पुढील शब्दांत मांडली. "चीन, बलशाली भूतकाळ लाभलेला बलशाली देश आणि आपला शेजारी, हा सदैव आपला मित्र राहीला आहे आणि ही मैत्री येत्या काळात वृद्धींगत होईल, आम्ही अशी प्रामाणिक ईच्छा व्येक्त करतो की, या देशातील सध्याच्या समस्या लवकर संपतील आणि एक अखंड व लोकशाहीवादी चीन उदयास येईल, जो जागतिक शांती आणि विकासाच्या प्रक्रियेत भरीव योगदान देईल. पंडित नेहरूंचा हा आत्मविश्वास अत्यंत अल्पजीवी ठरला.

चीन हा जगातील एकमेव देश आहे, ज्याचे १५ देशांबरोबर सीमा निश्चितीला धरून वाद आहेत. यात रशिया, भारत, जपान, कोरिया, मलेशिया, इंडोनेशिया, व्हियतनाम इत्यादी देशांबरोबर सीमाप्रश्न आणि लहान लहान बेटांना धरून वाद आहेत. सन १९९० च्या दशकात रशिया आणि काही मध्य आशियाई देशांसोबतचा सीमावाद चीनने बऱ्याच अंशी सोडवला. पण क्रूशईल बेटावरून दक्षिणपूर्व राष्ट्रांशी चीनचा अद्याप सीमावाद चालूच आहे. भारत-चीन सीमावाद हा यापैकीच एक आहे. भारत-चीन यांच्यादरम्यान जवळपास ३४८८ किलोमीटरची सीमा रेषा असून जम्मू-काश्मीर पासून ते अरुणाचल प्रदेशपर्यंत ती विस्तारलेली आहे. चीन भारताच्या ५०,००० वर्ग मैलावर आपला दावा सांगत आहे आणि विशेष म्हणजे हा सर्व प्रदेश सध्या चीनच्या नियंत्रनाखाली आहे. चीन भारताच्या पश्चिमेकडील लडाख आणि पूर्वेकडे अरुणाचल प्रदेशावर आपला अधिकार सांगीत आहे. एवढेच नव्हे तर २००४ पर्यंत सिक्कीमला भारताचा भाग मानण्यास चीन तयार नव्हता. परंतु २००४ मध्ये चीनने सिकिम हा भारताचा अविभाज्य घटक असल्याचे मान्य केले. चीनची प्रवृत्ती आक्रमक आणि साम्राज्यवादी असल्यामुळे भारत-चीन सीमाप्रश्न शांततेच्या मार्गाने सुटण्याची नजीकच्या भविष्यकाळात शक्यता नाही.

भारत-चीन मधील सीमावाद हा मुख्यतः दोन सीमारेशांवर आहे. उत्तर-पूर्व बाजूला 'मॅकमोहन रेषा' आणि उत्तर-पाश्चिम बाजूला लडाख. सन १९५४ नंतर सीमावादाच्या प्रश्नावरून भारत-चीन संबंधामध्ये तणाव निर्माण झाला. सन १९५४ च्या जुलै-ऑगस्ट महिन्यात चीनकडून प्रकाशित झालेल्या काही नकाशांमध्ये भारताच्या हद्दीतील बराच मोठा भाग चीनने आपल्या प्रदेशात दाखवला होता. सन १९६० मध्ये चीनने उघड घोषणा केली की, चीनला भारत-चीन दरम्यानची मॅकमोहन सीमारेषा मान्य नाही. भारताने चीनच्या या भूमिकेस प्रखर विरोध केला. त्यामुळे चीन चवताळला जाऊन २० ऑक्टोबर १९६२ रोजी चीनने भारतावर आक्रमण केले. चीनने १९ नोव्हेंबर १९६२ रोजी एकतर्फी युद्धबंदी घोषणा करून सैन्य मागे घेण्यास सुरुवात केली. अरुणाचल प्रदेशात मॅकमोहन रेषेपर्यंत त्याने सैन्य मागे घेतले. तथापी लडाख मध्ये जिंकलेल्या प्रदेशापैकी सुमारे २५०० चौ. मैल प्रदेश चीनने स्वतःच्या नियंत्रणाखाली कायम ठेवला.

बऱ्याच वर्षापासून चीघळणारा भारत-चीन सीमावाद हे चीनच्या भारतावरील आक्रमनामागील एक प्रमुख कारण होते हे तर खरेच. त्याचबरोबर वाटाघाटींचा सोपस्कार मार्ग सोडून देऊन भारतासोबत चीनने युद्धाचा मार्ग पत्करला, यामागे इतरही काही कारणे होती. एक म्हणजे, भारताने दक्षिण आशियातील चीनचे पुढारीपण मान्य न केल्याने भारताला धडा शिकवने चीनला महत्त्वाचे वाटले. एकदा भारताला नमविले की मग आग्नेय आशियावर वर्चस्व निर्माण करणे सहज शक्य होईल असे चीनला वाटत होते. दोन, चीनच्या अंतर्गत प्रश्नांवरून चिनी जनतेचे लक्ष अन्यत्र वळविण्याची गरज. तीन, चीनची विस्तारवादी नीती. चार, चीन व पूर्वाश्रमीचा सोव्हियत संघ (आताचा रशिया) यांच्यात वाढीस लागलेली कटुता हेही एक कारण चिनी हल्ल्यामागे होते. भारत-चीन युध्द भडकले की भारताला मदत करायची की साम्यवादी चीनला पाठींबा द्यावयाचा याचा निर्णय घेणे सोव्हियत संघाला भाग पडेल व चीनसंबंधीची सोव्हियत संघाची नीती स्पष्ट होईल असे चीनला वाटत होते. या आक्रमण काळात रशियाने भारताकडे पाठ फिरविल्यास भारत मदतीकरिता पाश्चिमात्य राष्ट्रांकडे वळला की भारताच्या अलिप्तता धोरणाचा फोलपणा उघड होईल आणि मग पश्चिमेकडे झुकलेल्या भारताशी मैत्री करणे व्यर्थ आहे हे सोव्हियत संघाला कळून चुकेल, असाही चीनचा अंदाज होता. शिवाय क्युबातील सोव्हियत संघाच्या लष्करी तळावरून अमेरिका-सोव्हियत संघात युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. अशा आणीबाणी सदृश्य परिस्थितीत ती राष्ट्रे भारताला मदत करू शकणार नाहीत अशीही चीनची अटकळ होती.

पुढे पाच वर्षांनी चीनने पुन्हा एकदा आपल्या सीमांचा विस्तार करण्याच्या हेतूने १ ऑक्टोबर १९६७ रोजी सिक्कीम गिळंकृत करण्यासाठी नथुला या भारतीय प्रदेशावर आक्रमण केले. या युद्धात ८८ भारतीय सैनिक शहीद झाले तर चीनचे चारशे जवान मारले गेले. या युद्धात चीनच्या आक्रमणास भारताने जशास तसे उत्तर दिले.

आता सन १९६२ प्रमाणे मोठ्या प्रमाणात ' सर्जिकल स्ट्राईक ' करून भारताला पराभवाची धूळ चारणे शक्य नाही याची चीनला पुरेशी जाणीव आहे. सन १९८७ मध्ये चीनने याचा पहिला धडा घेतला होता. त्यावेळी चिनी सैन्याने भारताच्या सुमदोरांग चू भागामध्ये तळ ठोकल्यानंतर भारताने जशासतसे उत्तर दिले. भारताच्या

प्रतिहल्ल्यात चीनचे १००० सैनिक मारले गेले आणि चीनला आपला काही भूभाग देखील गमवावा लागला. भारताने 'पहिली पापणी हलवनार नाही' ही ठाम भूमिका घेतल्याने अखेर चीनला माघार घ्यावी लागली होती. सन २०१३ मध्ये 'दौलत बेग ओल्डी' प्रकरणात याची पुनरावृत्ती झाली होती. सन १९६२ च्या युद्धात चीनने 'धोक्याने धक्का' देण्याचे तंत्र यशस्वीरीत्या वापरले होते. परंतु आता भविष्यात हे तंत्र कधीच यशस्वी होणार नाही याची खुद्द चिनी नेतृत्व आणि लष्कराला खात्री झाली आहे.

**'झिरो-सम' दृष्टीकोन :**

शीतयुद्धाच्या काळात सीमावादासारखे प्रश्न सोडवण्यासाठी चीनने युद्धाच्या मार्गाचा आधार घेतला होता. तथापि, शीतयुद्धोत्तर काळात चीनने आपल्या धोरणांमध्ये लवचिकता आणली असून अनेक राष्ट्रांबरोबर असलेले चीनचे सीमाविवाद शांतता आणि सहकार्याच्या माध्येमातून सोडवण्यास चीन प्राधान्य देत आहे. चीनने भारताविषयी आपल्या धोरणात लवचिकता आणलेली असून भारतासोबतचे संबंध सुधारण्यावर या काळात भर दिला गेल्याचे दिसते. १९९१ मध्ये चीनचे तत्कालीन पंतप्रधान लि पेंग यांच्या भारत भेटीने उभय राष्ट्रांदरम्यान सहकार्याचे एक नवे पर्व सुरु झाले. १९९३ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी चीनचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान भारत-चीनमधील सीमावाद शांतता आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडवण्यासाठी ऐतिहासिक करार करण्यात आला. सन १९९८ मध्ये भारताच्या अण्वस्त्रविकासाचा उद्देश जगाला पटवून देताना भारताचे तत्कालीन संरक्षण मंत्री जॉर्ज फर्नांडीस यांनी स्पष्ट केले, की, भारताला सर्वाधिक धोका हा चीनकडून असून, चीन हा भारताचा पहिल्या क्रमांकाचा शत्रू आहे. भारताच्या या भूमिकेमुळे भारत-चीन संबंधात काही काळ तणाव निर्माण झाला होता. तथापि, भारताचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री जसवंतसिंग यांनी चीनला भेट देऊन भारताच्या अण्वस्त्रनिर्मिती मागची भारताची भूमिका चीनला पटवून दिली. पुढे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची २००३ मधील एक आठवड्याच्या चीन यात्रेने भारत-चीन संबंधामध्ये मैत्रीच्या एका नव्या पर्वाला प्रारंभ झाला. वादग्रस्त राजकीय विषयांवर 'जैसे थे' परिस्थिती कायम ठेवून आर्थिक, व्यापारी, सांस्कृतिक, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात परस्पर सहकार्य करण्याला प्राधान्य देण्यात येवून या भेटीदरम्यान एकूण नऊ द्विपक्षीय करार आणि एक संयुक्त घोषणापत्रकावर स्वाक्षऱ्या झाल्या. सन २००६ मध्ये चीनचे तत्कालीन राष्ट्राध्येक्ष हु जिंताओ यांची भारत भेट पार पडली. या भेटीदरम्यान भारत आणि चीनने विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याविषयी दहा करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याच दरम्यान २००६ मध्ये सीमारेषेवरील व्यापार वाढावा या उद्देशाने भारत-चीन सीमेवरील नथुला खिंड व्यापारासाठी मुक्त करण्यात आली. मनमोहन सिंग यांच्या दहा वर्षाच्या कारकिर्दीत भारत-अमेरिका संबंधात सर्वाधिक सुधारणा झाली असली तरी द्विपक्षीय संबंधांना चीनविरोधी रंग येऊ नये याची काळजी घेण्यात आली होती. अमेरिकेला चीनविरोधी आघाडीत भारताच्या समावेशाचे गाजर दाखवायचे आणि चीनवर भारताच्या अमेरिकेशी संभाव्य युतीचा धाक ठेवायचा हे मनमोहन सिंग सरकारचे धोरण होते.

सन २०१४ मध्ये सत्तेत आलेल्या नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने भारत-चीन संबंधाकडे 'झिरो सम' प्रक्रियेतून बघण्यास सुरुवात केली. चीनच्या शक्तीत वाढ होणे म्हणजे भारताची शक्ती कमी होणे आणि भारताच्या प्रभावात वाढ होणे म्हणजे चीनचा प्रभाव कमी होणे असा 'झिरो-सम' चा अर्थ आहे. या दृष्टीकोनातून आशियात चीनविरोधी आघाडी प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांचा भारत भाग बनतो आहे. हा भारताच्या परराष्ट्र धोरणातील सर्वात मोठा आणि दूरगामी बदल ठरणार आहे.

**भारतीय धोरणातील परिपक्वता :**

'आता आणखी युध्द नको !... युद्धे कुणाच्याच हिताची नसतात, त्यातून विनाश होतो, त्यामुळे ती थांबली पाहिजेत' अशी अपेक्षा पोप जॉन यांनी एकदा व्यक्त केली खरी, पण अशी सुवचने जगाला ऐकू येत नाहीत, असे नेहमीच अनुभवास येते. दुसऱ्या महायुद्धानंतरही जगाणे युद्धे पाहिलीच नाहीत असे झाले नाही. प्रत्यक्ष युद्धे, शीतयुद्ध, यादवी संघर्ष, फुटीरतावाद्यांच्या हिंसाचारामुळे छुपे युद्धे, जिहादी संघर्ष, आक्रमण, अतिक्रमण, घुसखोरी व इतर अनेक हिंसक संघर्ष काळाच्या ओघात आंतरराष्ट्रीय पटावर उलगडत गेले. जगात अशा हिंसाचारात प्राणहानी झाली नाही असा एकही दिवस गेला नाही. उपरोल्लिखित घटनांपैकीच एक म्हणजे १९६२ चे भारत-चीन युद्ध. चीनच्या एकतर्फी युद्धबंदी घोषणेने नंतर युध्द विराम घडून आला परंतु कटुता तशीच राहिली. त्यामुळे शांतता निर्माण झाल्यासारखे वाटले, परंतु ती शाश्वत असू शकत

नाही हे भारत-चीन यांच्यातील १९६७, १९८७, २०१३, २०१४, २०१७ आणि आता २०२० च्या सीमेवरील चकमकीतून सिध्द झालेले आहे. १९६२ च्या कटू प्रसंगानंतर उभय देशांदरम्यानचे सीमावाद संवादाच्या माध्यमातून मिटविण्याच्या दोन्ही देशांच्या प्रमुखांनी वेळोवेळी आणाभाका घेतल्या, सीमाप्रश्नी वाटाघाटी हा एकच मार्ग आहे हे दोन्ही देशांना कळले. असे असले तरी चीनकडून मात्र वाटाघाटी किंवा संवादास फारसे महत्व दिले गेलेले नाही.

भारत-चीन यांच्या संबंधाचा विचार केला तर वेळोवेळी सीमाप्रश्नी काही ना काही घटना घडत आल्या आहेत. त्यानंतर चर्चा झाल्या. 'सामंजस्य' करार झाले. परंतु भारत-चीन यांच्यातील सीमावाद जुने झालेले नाहीत. अलीकडच्या काळात म्हणजे सन २०१३ मध्ये देपसांग येथे दोन्ही देशांदरम्यान सशस्त्र संघर्षाचे वातावरण निर्माण झाले होते. सन २०१४ मध्ये देमचोक व चुमार या भागांमधील वाद उफाळून आला पण त्यावरही समझोता होऊन तणाव कमी करण्यात दोन्ही राष्ट्रे यशस्वी झाले. चीनसारख्या शिरजोरी करणाऱ्या बलाढ्य शत्रूशी सलोखा निर्माण करण्याकरिता शांततापूर्ण चर्चेबरोबरच अपारंपारिक आणि पारंपारिक युध्द क्षमता असावी लागते. या क्षमतेचा अधूनमधून वापर करावा लागतो. शत्रूशी शांतता बुद्धिबळाच्या डावाप्रमाणे खेळावयास हवी. शांततेच्या वाटाघाटींबरोबरच आपल्या शत्रूंना पारंपारिक आणि अपारंपारिक युध्द क्षमतेची जाणीव करून देणे तितकेच महत्वाचे आहे. अलीकडच्या काळात ही नीती भारताने चाणाक्षपणे राबवली आहे यात शंका नाही.

**डोकलाम पेचप्रसंग :**

भारत-भूतान-चीन यांच्या तिवांध्याच्या भागात असलेल्या डोकलाम पठारावर जून २०१७ मध्ये भारत-चीन तणाव शिगेला पोहोचला होता. सिक्कीममध्ये भारत-चीन आणि भूतान यांच्या सीमा ज्या ट्रायजंक्शनजवळ मिळतात त्या डोकलाम भागातील डोको ला ( ला म्हणजे खिंड ) येथे चीनने रस्ते उभारणी सुरु केली होती. गेल्या काही वर्षात भारताच्या दक्षिण आशियातील प्रभावाला छेद देण्याचा चीनचा प्रयत्न आहे. भुतानच्या भूमीवर चीनद्वारे होत असलेली रस्ते उभारणी भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर परिणामकारक ठरणारे आहे. डोकलाम हे चिमुकल्या भुतानच्या ताब्यात आहे. आजपर्यंत एकमेकांच्या ताब्यातील भूभागावरच आमनेसामने येणाऱ्या भारत व चीन या दोन बलाढ्य देशांचे सैन्य एका तिसऱ्याच देशामध्ये भिडण्याचा कदाचित हा पहिलाच प्रसंग असावा. देपसांग व चुमार हे दोन्ही भूभाग भारताच्या ताब्यात होते. डोकलामपासून अगदी जवळच आहे. संपूर्ण ईशान्य भारताला उर्वरित देशाशी जोडणारा 'सिलीगुडी कॅरीडॉर' उर्फ 'चीकन्स नेक'. भारतासाठी एकदम संवेदनशील टापू. म्हणजे डोकलामचे रक्षण हे एका अर्थाने भारताचेही संरक्षण. जूनच्या मध्यावधीस चिनी लष्कराने अतिक्रमण करून डोकलाममध्ये एकाएकी रस्ते बांधने चालू केले, तेव्हा भूतानच्या विनंतीवरून भारतीय सैन्य तिथे उभे ठाकले. कारण आजवर भारताशी एकनिष्ठ राहिलेल्या भूतानच्या 'संरक्षणा' ची जबाबदारी सन १९४९ च्या भारत-भूतान मैत्री करारान्वये भारताची आहे हे भारताद्वारे मान्य करण्यात आलेले आहे. या कराराचे २००७ मध्ये नुतनीकरण करण्यात आले आहे.

भारत- चीन यांच्यात डोकलाम क्षेत्रात लष्करी तणाव उत्पन्न झाल्याच्या पार्श्वभूमीवर भारताच्या तत्कालीन परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी संसदेत केलेले भाषण महत्वपूर्ण आहे. भारत-चीन संबंधावर भाष्य करताना 'युध्द हा कोणत्याही समस्येवरील उपाय नसून 'चर्चेतून प्रश्न सोडवण्यात राष्ट्रहित' असल्याचा त्यांचा सूर होता. सीमाप्रश्नी चीनसंबंधीच्या भारतीय धोरणात सन १९६२ नंतर एक महत्त्वाचा बदल घडला. १९६२ पूर्वी लष्करी तयारी नसताना राजकीय नेतृत्वाने सीमाप्रश्नी चर्चेचे दरवाजे अर्धवट बंद केले होते. मात्र सन १९६२ च्या नामुष्कीतून धडा घेत, भारताने प्रत्येक तणावप्रसंगी संपूर्ण लष्करी तयारी ठेवत चर्चेवर भर दिला. सन १९६७, १९८७, २०१३, आणि २०१४ मध्ये भारत-चीन सीमेवर डोकलामसारखी परिस्थिती निर्माण झाली होती, जी वाटाघाटीतून निवळली. मुख्य म्हणजे, यापैकी एकाही प्रसंगी भारताला कुठलीही तडजोड करावी लागली नाही.

**लडाख (गलवान) मधील घुसखोरी :**

सन २०१७ चे डोकलाममधील सौहार्द हे चीनचे एक पाऊल मागे घेणे असले तरी त्या देशाची लवकरच दोन पावले पुढे पडू शकतात हे चीनने गलवान खोऱ्यातील घुसखोरीने सिध्द केले आहे. भारताला दणका द्यायचा, हादरवून टाकायचे आणि मग माघार घेत चर्चा करायची असा सल्ला माओ झेडांग यांनी आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना १९६२ साली दिला होता. तेव्हापासून आजतागायत चीनच्या भारतविषयक प्रत्येक चालीत हे

दिसून येते. आताही लडाख मधील गलवान घाटीतील तणातणीतून समेट काढत असताना चीनच्या याच धोरणाचे प्रत्यंतर येते. ६ मे २०२० रोजी चिनी सैन्याने लडाखमधील गलवान घाटीत घुसखोरी केल्याचे उघडकीस आले. चीन पूर्वीपासूनच लडाखवर आपला हक्क सांगत आलेला आहे. परंतु या घुसखोरीमागे हे एकमेव कारण आहे असे नाही तर त्याची इतरही काही कारणे आहेत. एक, कोरोना विषाणूच्या जागतिक संकटावरून अमेरिकेसह जगातील बडी राष्ट्रे चीनला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोरोना महामारीवरून चीनविरोधात जागतिक वातावरण तापलेले आहे. पाश्चात्य देश चीनला वाळीत टाकण्याच्या प्रयत्नात आहेत, याची चीन सरकारला जाणीव आहे. हे चीनच्या नेतृत्वासमोरील मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर चीन भारतासारख्या बड्या स्पर्धकाला सीमा प्रश्नावरून कुरघोडी करून आम्ही जगाला भिक घालणार नाही हा संदेश देऊ इच्छित आहे. दोन, 'कोविड-१९' मुळे आपल्या सामर्थ्यात फरक पडलेला नाही, असा संदेश चीनला यातून शेजारी देशांना द्यायचा आहे. तीन, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी काही दिवसांपूर्वीच G-७ या संघटनेचा विस्तार करण्याची गरज प्रतिपादन करून भारताला या संघटनेचे सभासदत्व बहाल करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. भारताच्या G-७ संघटनेच्या संभाव्य प्रवेशाने चीन धास्तावला आहे. भारताने अमेरिका धार्जिण्या G-७ सारख्या कोणत्याही संघटनेपासून दोन हात दूर रहावे असा इशारा चीन भारताला या घुसखोरीच्या माध्यमातून देऊ इच्छित आहे. चार, भारताने अमेरिकेशी कितीही सलगी केली, तरी त्याचा आपण केलेल्या सीमेवरील दाव्यांवर व कारवायांवर काहीही परिणाम होणार नाही, चीन, हे भारताला दाखवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. भारत-अमेरिका सयुंक्त लष्करी कवायती व सामरिक सलगीच्या करारामुळे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर भारतासाठी अमेरीकेची मदत निरुपयोगी ठरेल, असा गंभीर सूचक इशारा चीन भारताला देत आहे. पाच, कोरोना विषाणूने जगात ज्याप्रकारे हैदोस घातला आहे तसा तो चीनमध्ये देखील घातलेला आहे. चीनमधील कोरोना बळींचा खरा आकडा चीन जगापासून लपवून ठेवत आहे. खरं तर कोरोना बळींची संख्या जगात सर्वाधिक चीनमध्ये असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या पार्श्वभूमीवर चिनी जनतेत नेतृत्वाविरुध्ह रोष वाढू शकतो. चिन सरकार जनतेचे लक्ष इतरत्र विचलित करू पहात आहे. या नीतीचाच एक भाग म्हणून चीनने सध्या भारतीय हद्दीत घुसखोरी केलेली असावी.

परंतु भारत-चीन यांच्यादरम्यान खरा तणाव वाढला तो १६ जून नंतर. चिनी लष्कराने भारत-चीन दरम्यान २००९ साली झालेल्या सीमा शस्त्रबंदी कराराचे उल्लंघन करून भारतीय सैन्यावर लोखंडी रॉड, काठ्या आणि दगडांच्या सहाय्याने हल्ला केला. या हल्ल्यात एका सैन्याधीकाऱ्यासह भारताचे वीस जवान शहीद झाले. भारतीय लष्कराच्या प्रतिहल्ल्यात चीनचे ३५ सैनिक मारले गेले असा अमेरिकन गुप्तचर संस्थेचा दावा आहे. परिणामी उभय देशांदरम्यान तणाव शिगेला पोहोचला. या पेचप्रसंगाच्या अनुषंगाने काहीजन 'निषध नको, बदला हवा' ची भाषा करतात. बदला हवा या भावनेमागे त्यांना चीनसोबत 'आरपारची लढा' अपेक्षित असते. काहीजण चिनी मालावर सरळ बहिष्कार घालण्याची भाषा करून चीनबाबत साठून राहिलेल्या असंतोषाला मोकळी वाट करून देत आहेत. चिनच्या नृशंस वर्तनाने भारताचे वीस जवान शहीद झाल्याने जाज्वल्ले देशप्रेमातून आपल्या शेजाऱ्याविषयी संतापाची लाट आली असून तसे होणे काही प्रमाणत नैसर्गिकही ठरते. परंतु एखाद्या देशातील वस्तूंवर बहिष्कार टाकणे आजच्या जागतिकीकरणात आणि भारत-चीन गॅट कराराचे सदस्य राष्ट्र असल्याने कायदेशीर दुष्ट्या शक्य नाही. खरं तर 'बहिष्कार' (चिनी हटाव) हा स्वतंत्र संशोधनाचे विषय आहेत.

**पुर्णस्वरूपी युध्द नाही :**

गलवान खोऱ्यातील पेचप्रसंगावरून सीमेवरील हा तणाव भविष्यातही कायम राहणार आहे. परंतु या तणावाचे रुपांतर युद्धात होण्याची शक्यता फारच कमी आहे. भारत आणि चीन हे दोन्ही देश आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आहेत आणि आर्थिक विकासावर युद्धाचे किती गंभीर परिणाम होऊ शकतात याची जाणीव या देशांना आहे. त्याहून महत्वाचे म्हणजे, १९६२ मध्ये होतो त्यापेक्षा आपण लष्करी पातळीवर बलशाली आहोत असे चीनला वाटते. पण चीनला हेही माहित आहे, की भारतसुद्धा लष्करी पातळीवर १९६२ पेक्षा जास्त मजबूत आहे. मात्र १९६२ प्रमाणे आताच्या संघर्षाचे स्वरूप असणार नाही. २०२० मधील या संघर्षात स्पष्ट विजेता कुणीच असणार नाही. चिनी तज्ज्ञांनी म्हटले आहे, की चीनच्या सध्याच्या कृतींचे हेतू काहीही असोत; त्यात भारताविरोधात पुर्णस्वरूपी युध्द होणार नाही.

भारत-चीन हे दोन्ही देश आताच्या काळात सीमाप्रश्न गंभीर वळणावर जाऊ देतील, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. मॅकमोहन रेषा जेव्हा आखण्यात आली तेव्हापासून वादाचे निमित्त सुरु झाले; त्यानंतरच्या काळात याचीच परिणती १९६२ च्या भारत-चीन युद्धात झाली. १९६२ नंतर उभय देशांदरम्यान सीमेवर तणावाचे प्रसंग अनेकवेळा उद्भवलेले आहेत. सध्याचा वाद हा जुन्याच वादाचा पुढचा अध्याय आहे. दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज आहेत. अशावेळी सर्वंकष व दीर्घ मुदतीचे युध्द करणे कोणालाच परवडणारे नाही.

**१९६२ नंतरचा भारत :**

भारताने स्वीकारलेले उदारीकरणाचे धोरण यामुळे भारताच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या अहवालांमधून भारताच्या आर्थिक प्रगतीची दखल घेतली जाऊ लागली, एवढेच नाही तर या संस्थांनी २०२५ पर्यंत, अमेरिका आणि चीननंतर जगातील तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून भारत उदयाला येईल, अशी भाकिते केली आहेत. महत्वाचे म्हणजे लष्करी महासत्ता म्हणून उदयाला येण्याची भारताची महत्वाकांक्षा १९९८ मध्येच पूर्ण झाली आहे. या वर्षी भारताने पाच अणुचाचण्या करून स्वतःला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. आजघडीस भारताकडे १५० ते १६० अण्वस्त्रे आहेत. आशिया खंडात भारताचा वाढता प्रभाव आपल्यासाठी आव्हान असल्याचे चीनला समजले आहे. आताचा भारत आणि १९६२ चा भारत यांमध्ये मोठे अंतर असल्याची जाणीव चीनला झाली आहे. सन २०१२ मध्ये ५००० ते ६००० कि.मी. लांब पल्ल्याची क्षमता असणाऱ्या 'अग्नी-५' या आंतरखंडीय क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करून भारत लष्करीदृष्ट्या महासत्ता बनला आहे. भारताने आंतरखंडीय क्षेपणास्त्र तयार केल्याने आशियात संतुलन निर्माण झाले आहे. त्यामुळे चीनला कायम काळजीपूर्वक पावले टाकावी लागतील. आज भारत हा अण्वस्त्रे असलेला व दुसऱ्या क्रमांकाचे मोठे लष्कर असलेला देश आहे. त्यामुळे कुठल्याही परदेशी आक्रमणात देशाचे संरक्षण करण्याची क्षमता भारताकडे निश्चितच आहे हे चीनला कळून चुकले आहे. म्हणूनच गेल्या दशकात भारत-चीन सीमा तणावपूर्ण राहिल्या असल्या तरी चीनच्या सशस्त्र आक्रमणाची शक्यता आता इतिहास जमा झाली आहे.

चीनला आज भारताबरोबर घनिष्ठ आर्थिक व व्यापारी संबंध हवे आहेत. भारतातील वाढत्या मध्यमवर्गीय बाजारपेठेचा फायदा चीनला हवा आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यात भारताच्या विरोधात चीन आक्रमक पवित्रा घेईल असे वाटत नाही. याचा अर्थ असा नाही, की दोन्ही देशांच्या सीमेवर संपूर्ण शांतता असेल. सीमेवर चकमकी, सीमारेषेचे उल्लंघन या घटनांमुळे निर्माण झालेला तणाव युद्धात परावर्तीत होऊ द्यायचा नाही, याविषयीचा राजकीय शहाणपणा चीनचे नेतृत्व नक्कीच दाखवेल.

**सारांश :**

चिनी राज्यकर्ते आणि समाजातील अभिजन वर्ग नेहमीच राजकीय अराजकतेच्या भीतीने धास्तावलेला असतो. ही भीती मुख्यतः दोन बाबींमुळे आहे. एक, तिबेट आणि शिनजियांग प्रांतातील प्रचंड असंतोषाचे रुपांतर जाहीर उठावात झाल्यास त्याचे चीनच्या इतर भागांमध्ये देखील पडसाद उमटू शकतात. असे झाल्यास, इतर प्रांतातील वांशिक अल्पसंख्यांक समूह साम्यवादी पक्षाचे नेतृत्व झुगारून देऊ शकतात, ज्याचा परिणाम साम्यवादी पक्षाची सत्तेवरील पकड सैल होण्यावर होऊ शकतो. दोन, चीनमधील प्रचंड आर्थिक दरीमुळे 'नाही रे' वर्गात असंतोषाने मुळे धरली आहेत. या असंतोषामुळे चीनमधील मोठ्या वर्गाला साम्यवादी पक्षाबद्दल आदर वाटेनासा झाला आहे. याचे रुपांतर वेगवेगळ्या स्तरांवर स्थानिक सरकारी अधिकारी तसेच पक्षाचे स्थानिक पदाधिकारी यांच्याविरुद्ध विविध स्वरुपात जाहीर विरोध प्रदर्शनांमध्य होत आहे. एका वर्षात घडणाऱ्या अशा प्रदर्शनांची संख्या लाखांमध्ये आहे. विरोधाच्या या ठिणग्या एकाच वेळी प्रज्वलित झाल्यास साम्यवादी पक्षाच्या हाताबाहेर परिस्थिती जाण्याचा धोका आहे. यातून उद्भवणारा संघर्ष पुन्हा एकदा चीनला अराजकतेकडे घेऊन जाईल. अराजकतेच्या भीतीने असुरक्षित झालेला चीन म्हणूनच आंतरराष्ट्रीय राजकारणात आक्रस्ताळेपणा दाखवत आहे. चीनच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील धसमुसळ्या वर्तनाचा सर्वात मोठा फटका आज भारताला बसत आहे. त्याचा परिणाम उभय देशांच्या राजनैतिक संबंधावर झाल्याचे जाणवते.

**संदर्भ सूची :**

१. Bindra S.S., India and Her Neighbours - A Study of Political, Economic and Cultural Relations and

Interaction, Deep and Deep publications, New Delhi, 1984

२. Dutt V.P., India's Foreign Policy In A Changing World, Vikas Publishing House PVT.LTD., New Delhi, 2008

३. Ganguly Sumit, (Edited) India's Foreign Policy - Retrospect and Prospect, Oxford university Press, New Delhi, 2012

४. Khanna V.N., Foreign Policy of India, Vikas Publishing House PVT.LTD., New Delhi, 2011

५. देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरण- सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, जानेवारी २०१०

६. दिवाण चंद्रशेखर, भारताची विदेश नीती, विद्या प्रकाशन नागपूर,

७. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास(१९४७-२०००), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१३

८. पाटील वा. भा., भारताचे परराष्ट्र धोरण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१५

९. पेंडसे अरुणा आणि सहस्त्रबुद्धे उत्तरा, आंतरराष्ट्रीय संबंध, शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट ब्लॅकस्वान, मुंबई, २०११

१०. परिमल माया सुधाकर, अग्रलेख, दैनिक लोकसत्ता, दि.२० जून २०१६, १० ऑक्टोबर २०१६, ७ नोव्हेंबर २०१६, १० ऑगस्ट २०१७,

११. महाजन हेमंत (निवृत्त ब्रिगेडियर), अग्रलेख, दैनिक दिव्य मराठी, दि. ३१ ऑगस्ट २०१७

१२. साठे अनिकेत, चिनी ज्यादा, लोकरंग पुरवणी, दैनिक लोकसत्ता, दि. ५ सप्टेंबर २०१०